# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** पलूस

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0361 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/10/2022 01:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 19/10/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/10/2022
**Time From (वेळेपासून):** 16:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/10/2022 **Time (वेळ):** 01:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/10/2022 01:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पलूस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राहुल सुनील चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चिखलहोळ,खानापुर ,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चिखलहोळ,खानापुर ,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अतुल श्रीरंग पेटकर | | | 1. सोमवार पेठ कासार गल्ली , तासगांव,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सागर विलास चव्हाण | | | 1. पाण्याचे टाकी जवळ ,नवेखेड, पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 45,000.00 |



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

45,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब ता. 20.10.2022

मी राहुल सुनील चव्हाण वय 35 वर्ष व्यवसाय:- सोलर इन्स्टॉलर रा. मु.पो. चिखलहोळ ता.खानापूर जि.सांगली मो.नं. 9558729990

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझी विवस्वान इन्डस्ट्रीज ओपीसी प्रावेट लिमीटेड ठाणे या नायाची सोलर इन्स्टॉलेशनची कंपनी आहे. श्री.सिध्दनाथ पॉलीमर्स, चिंचणी ता.कडेगांव या कंपनीकडून फेब्रा ुवारी 2022 मध्ये आमचे कंपनीस सोलर इन्स्टॉलेशनची ऑर्डर मिळालेली होती. त्यासाठी श्री.सिध्दनाथ पॉलीमर्स यांचे वतीने दि.11.02.2022 रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वेबसाईटवर सोलर इन्स्टॉलेशनची परवानगी मिळणेसाठीचा ऑनलाईन अर्ज केला आहे. सदर अर्जाची हार्ड कॉपी मी फेब्रा ुवारी महिन्यामध्ये महावितरण उप विभागीय कार्यालय पलुस या ठिक ाणी जमा करण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्या ठिकाणी कार्यरत असलेले पेटकर, उप कार्यकारी अभियंता यांनी मला सदर अर्जाची प्रत महावितरण सर्कल कार्यालय सांगली यांचे कार्यालयाकडून यावी लागते अशी माहिती दिली. त्याप्रमाणे मी दि.17.02.2022 रोजी महावितरण सर्कल कार्यालय सांगली या ठिकाणी सोलर इन्स्टॉलेशनची परवानगी मिळणेसाठीच्या ऑनलाईन अर्जाची हार्ड कॉपी जमा केली होती.

त्यानंतर मी उप कार्यकारी अभियंता पेटकर व सहाय्यक अभियंता चव्हाण महावितरण उप विभागीय कार्यालय पलुस यांची वारंवार भेट घेवून माझी परवानगीची फाईल मंजूर करून देण्याबाबत विनंती केली होती. दि. 09.09.2022 रोजी उप कार्यकारी अभियंता श्री.पेटकर व सहाय्यक अभियंता चव्हाण यांनी श्री.सिध्दनाथ पॉलीमर्स, चिंचनी ता.कडेगांव या ठिकाणी साईट व्हिजीट करून सोलर इन्स्टॉलेशनच्या ठिकाणी असलेले जनरेशन मिटर मुळ जागेवरून बाहेर शिप्ट करण्यास सांगीतले. दरम्यान महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वेबसाईटवर केलेल्या ऑनलाईन अर्जाची मुदत दि.11.09.2022 रोजी संपली त्यामुळे मी पुन्हा ऑनलाईन रिअ ॅप्लीकेशन केले आहे.

दि.27.09.2022 रोजी मी माझ्या वरील कामासाठी श्री.पेटकर यांना संपर्क केला होता त्यावळी त्यांनी कडेगांव येथे येण्यास सांगीतल्याने मी महावितरण उप विभागीय कार्यालय कार्यालय या ठिकाणी जावून उप कार्यकारी अभियंता पेठकर यांची भेट घेतली. त्यावेळी श्री.पेटकर य ांनी श्री.सिध्दनाथ पॉलीमर्स, चिंचनी ता.कडेगांव येथे ज्या ठिकाणी सोलर प्रोजेक्ट बसणार आहे त्या ठिकाणी असलेले जनरेशन मिटर मुळ जागेवरून बाहेर शिप्ट करण्यासाठी 45,000/- रूपये खर्च येणार असून सदरचे ज़नरेशन मिटर मुळ जागेवर आहे तेथेच राहु द्या त्या साठी होणारा 45,000/- रूपये खर्च वाचणार असून ते वाचणारे 45,000/- रूपये आम्हाला द्या असे म्हणून श्री.पेटकर यांनी माझ्याकडे सोलर इन्स्टॉलेशनच्या परवानगीची फाईल मंजूर करून देण्यासाठी लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना विचार करून सांगतो असे सांगीतले. त्यावेळी श्री.पेटकर यांनी मला दुस-या दिवशी महावितरण कार्यालय पलुस या ठिकाणी येऊन सहाय्यक अभियंता चव्हाण यांना भेटण्यास सांगीतले.

मी चार ते पाच महिन्या पुर्वी किर्लोस्करवाडी व कुंडल या मध्ये सोलर प्रोजेक्ट चे काम केलेले आहे. त्या प्रोजेक्टच्या परवानगीच्या कामामध्ये श्री.चव्हाण सहाय्यक अभियंता यांनी माझ्याकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी केलेली होती परंतू मी त्यांना पैसे दिलेले नव्हते.

श्री.पेटकर यांनी माझ्याकडे 45,000/- रूपये लाचेची मागणी करून श्री.चव्हाण यांची भेट घेण्यास सांगीतले आहे. तसेच श्री.चव्हाण सहाय्यक अभियंता यांनी देखील माझ्या पुर्वीच्या कामामध्ये लाचेची मागणी केली होती त्यामुळे या कामामध्ये देखील ते माझ्याकडे लाचेची मागणी करतील अशी माझी खात्री झाली होती. परंतू मला श्री. पेटकर उप कार्यकारी अभियंता व श्री.चव्हाण सहाय्यक अभियंता यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि. 28.09.2022 रोजी मी श्री.सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, अ ॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना संपर्क करून



Scanned with OKEN Scanner

माझी श्री.पेटकर,उप कार्यकारी अभियंता व श्री.चव्हाण, सहाय्यक अभियंता महावितरण उप विभागीय कार्यालय पलुस यांचे विरूध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे कळविले होते. श्री.घाटगे साहेब यांनी मला तुरची फाटा या ठिकाणी हजर राहण्याच्या सुचना दिल्या. मी त्या दिवशी सकाळी 11 वाजण्याचे सुमारास चव्हाण यांचे 7875769634 या क्रमांकावरून माझे मोबाईल क्रमांक 9558729990 या वर मला कॉल आला होता त्यावेळी चव्हाण यांनी मला दुपारी साडे तीन पर्यंत येण्यास सांगीतले होते.

त्यानंतर दि.28.09.2022 रोजी दुपारी तीन वाजण्याचे सुमारास मी तुरची फाटा या ठिकाणी हजर होऊन श्री. घाटगे साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचे सोबत त्यांचे पथक हजर होते. घाटगे साहेब यांनी मला त्याचे पथकातील श्री.दत्तात्रय पुजारी,पोलीस निरीक्षक यांची ओळख करून दिली. मी श्री.पेटकर व श्री. चव्हाण यांचे विरूध्दचा तक्रारी अर्ज पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केला. पुजारी साहेब यांनी त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती दिली. पुजारी साहेब यंानी त्यांचे सोबत आलेले दोन शासकीय पंच तसेच त्यांचा स्टाफ यांची ओळख करून दिली.

पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. महेश जगन्नाथ कुंभार यांची पंच नं. 1 म्हणुन व श्री. नितिश सोपान माळी यांची पंच नं. 2 म्हणुन काम निवड केली. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर मी माझा तक्रारी अर्ज पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केला. पुजारी साहेब यांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला त्यांनी तो वाचून त्यावर सह्या केल्या.

पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंच कुंभार यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच कुंभार असे माझ्याकडील डॅट सन गो प्लस कंपनीची एम.एच.10 सी.एक्स 4903 या कार मधून रवाना होवून महावितरण उप विभागीय कार्यालय पलूस या ठिकाणी जावून मी माझी कार पार्क केली. मी व पंच कुंभार असे कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी सहाय्यक अभियंता चव्हाण तसेच उप कार्यकारी अभियंता पेटकर हे दोघेही हजर नव्हते. मी कार्यालयामध्ये चव्हाण यांचेबाबत चौकशी केली असता त्या ठिकाण्ी असलेल्या कर्मचा-याकडून चव्हाण साहेब कुंडलला गेले असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर मी चव्हाण साहेब यांना माझ्या मोबाईल वरून कॉल करण्याचा प्रयत्न केला परंतू चव्हाण यांनी माझा कॉल रिसिव्ह केला नाही. त्यानंतर मी व पंच कुंभार असे कार्यालयातून बाहेर येवून माझ्या कारमध्ये येऊन बसलो. काही वेळ वाट बघून मी चव्हाण यांना पुन्हा संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता चव्हाण यंानी माझा कॉल रिसिव्ह केला. मी माझ्या मोबाईलचा स्पिकर फोन ऑन करून त्यांचेशी बोलणे केले. चव्हाण यांनी मला कुंडलमध्येच असल्याचे सांगून त्यांना येण्यास वेळ लाणार असल्याचे सांगीतले. त्यावर मी त्यांना थांबू का जाऊ याबाबत विचारले असता चव्हाण यांनी मला साहेब आहेत का ? साहेबांना फोन झाला आहे का ? असे विचारले. त्यावर मी त्यांना साहेब कार्यालयात नसल्याचे सांगून साहेबांशी काल कडेगांव मध्ये भेटलो असल्याचे सांगीतले. त्यावर चव्हाण यंानी मला साहेबांकडे कडेगांवचा चार्ज असून ते कडेगांवला गेले असल्याचे संागीतले. चव्हाण साहेब यांनी पेटकर साहेबांशी बोलणे झाल्याचे सांगून साहेबांनी बसून बोलूया असे म्हणाल्याचे सांगीतले. मी चव्हाण यांचेशी कामाबाबत चर्चा केली. चव्हाण साहेबांनी मला उद्या या असे सांगून उद्या क्लीअर करून टाकू असे म्हणाले. मी त्यांना उद्या फोन करून येतो असे म्हणून कॉल कट केला. त्यानंतर मी व पंच कुंभार माझ्याकडील कारमधून रवाना होऊन पुजारी साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पुजारी साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर पुजारी साहेब यांनी विचारले वरून पंच कुंभार व त्यानंतर मी घडलेली हकिगत पुजारी साहेब यांना सांगीतली. त्यानंतर पुजारी साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व श्री. चव्हाण सहाय्यक अभियंता यांचेत मोबाईल वरून झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला दि.29.09.2022 रोजी दुपारी एक वाजण्याचे सुमारास तुरची फाटा या ठिकाणी हजर राहण्याबाबत सुचना देऊन मला जाण्यास सांगीतले.

दि.29.09.2022 रोजी दुपारी एक वाजण्याचे सुमारास तुरची फाटा या ठिकाणी हजर होवून पुजारी साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पुजारी साहेब यांचे सोबत दोन शासकीय पंच व त्यांचा स्टाफ हजर होता. त्यावेळी पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये मेमरी कार्ड टाकले. पुजारी साहेब यांनी मला व पंच कुंभार यांना पडताळणी कामी आवश्यक सुचना दिल्या. पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला.मी तो माझे पॅन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच कुंभार असे माझ्याकडील कारमधून रवाना होवून महावितरण उप विभागीय कार्यालय पलूस या ठिकाणी जावून मी माझी कार पार्क केली. मी व पंच कुंभार असे कार्यालयात गेलो. कार्यालयामध्ये पेटकर साहेब हजर नव्हते. मी व पंच कुंभार असे चव्हाण साहेब याचे केबीनमध्ये गेलो त्या ठिकाणी चव्हाण साहेब हजर होते. मी चव्हाण साहेब यांची भेट



Scanned with OKEN Scanner

घेवून माझ्या कामाबाबत चर्चा केली. मी चव्हाण साहेब यांना पेटकर साहेब यांचे बाबत विचारणा केली. असता चव्हाण साहेब यांनी पेटकर साहेब सुनावणीला गेले असल्याचे सांगीतले. मी त्यंाचेशी कामाबाबत चर्चा करून साहेबांशी बोलून घेण्याबाबत सांगीतले. त्यावेळी चव्हाण साहेब यांनी पैशांबाबत विषय काढला नाही. आमच्यातील कामाबाबत चर्चा झाल्यानंतर मी व पंच कुंभार असे कार्यालयामधून बाहेर आलो. त्यानंतर मी व पंच कुंभार माझ्याकडील कारमधून रवाना होऊन पुजारी साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पुजारी साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर पुजारी साहेब यांनी विचारले वरून पंच कुंभार व त्यानंतर मी घडलेली हकिगत पुजारी साहेब यांना सांगीतली. त्यानंतर पुजारी साहेब, दोन्ही पंच तसेच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमधील माझ्यात व श्री. चव्हाण सहाय्यक अभियंता यांचेत झालेले संभाषण ऐकले.

दरम्यान मुदतीत चव्हाण सहाय्यक अभियंता यांचा माझ्या मोबाईलवर मिस कॉल आल्याचे दिसल्याने मी पुजारी साहेब यांना माहिती दिली. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्या मोबाईलवरून चव्हाण यांना कॉल करून माझ्या मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. चव्हाण यांनी माझा कॉल रिसिव्ह करून साहेब आले असल्याचे संागून भेटणार असाल तर भेटा असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाच मिनीटात येत असल्याचे संागून कॉल कट केला. सदरचा कॉल पुजारी साहेब यांनी दोन पंचा समक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनीमुद्रीत केला आहे.

पुजारी साहेब यांनी मला व पंच कुंभार यांना पडताळणी कामी आवश्यक सुचना दिल्या. पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला.मी तो माझे पॅन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच कुंभार असे माझ्याकडील कारमधून रवाना होवून महावितरण उप विभागीय कार्यालय पलूस या ठिकाणी जावून मी माझी कार पार्क केली. मी व पंच कुंभार असे कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी पेटकर साहेब त्यांचे केबीनमध्ये हजर होते. मी त्यंाची भेट घेवून कामा बाबत चर्चा केली. पेटकर साहेबांनी मला सांगीतले की, विनाकारण चाळीस पन्नास हजार रूपये खर्च करण्या पेक्षा अॅडजेस्ट करण्याबाबत चव्हाण यांना सांगीतले आहे. त्यानंतर मी त्यांचेशी कस्टमरच्या फॅक्ट्रीच्या मिटरच्या रिडींग संदर्भात चर्चा केली. आमचेत चर्चा सुरु असताना केबीनमध्ये चव्हाण हे देखील आले. त्यावेळी पेटकर साहेबांनी चव्हाण साहेबांना "पंचेचाळीस त्याला घालवण्यापेक्षा तुम्ही घ्या" असे सांगून "तुमची तुम्ही बघा तेवढ¬ासाठी वेळ

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

Vikas Tulshidas Jadhav(I (Inspector)) / PCMH92821 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vikas Tulshidas Jadh
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH92821

ठाणे अंमलदार
पलूस पोलीस स्टेशन



Scanned with OKEN Scanner